# मेट्रो ३ : फेब्रुवारी महिन्यात दुसऱ्या टप्प्यातील चाचणीच्या हालचालींना वेग मिळणार



**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या भुयारी मार्गाच्या आरे कॉलनीतील सारीपूत नगर येथील कारडेपोमध्ये पहिल्या प्रोटोटाईप ट्रेनच्या माध्यमातून ३ किमीपर्यंत अंतरावर चाचण्या सुरू आहेत. फेब्रुवारी २०२३ पासून विस्तारित सहार रोडपर्यंतची चाचणी सुरू करण्यात येणार असल्याची माहिती एमएमआरसीए अधिकाऱ्यांनी दिली आहे.

सारीपूत नगर ते मरोळ या ३ किमी अंतरादरम्यान पहिल्या प्रोटोटाईप ट्रेनच्या माध्यमातून चाचण्या सुरू आहेत. ३० ऑगस्टपासून ट्रायल रन सुरू झाल्यानंतर १ हजार किमीपेक्षा जास्त अंतर प्रोटोटाईप ट्रेनच्या माध्यमातून कापण्यात आले आहे. चाचणीदरम्यान सुरूवातीला १० किमी प्रतितास वेगाने ट्रेन चालवण्यात येत आहे. त्यानंतर ६५ किमी प्रतितास वेग नोंदवण्यात आला असून, दुसऱ्या टप्प्यादरम्यान हाच वेग ८५ ते ९५ किमी प्रतितास असणार आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल २ पर्यंतच्या कामासह सहार रोड स्थानकापर्यंत ट्रॅक टाकण्याचे काम सुरू आहे. सर्व प्रमाणपत्र, परवानग्या आणि मेट्रो रेल्वे सुरक्षा प्रमाणपत्र आयुक्तांच्या माध्यमातून देण्यात येणार आहे.

डिसेंबर २०२३ मध्ये मेट्रो ३ च्या पहिल्या टप्प्याचे, तर जुलै २०२४ मध्ये संपूर्ण मार्गिकेचे लोकार्पण करण्यात येणार आहे.